**<u>फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ प्रमाणे पुरावा</u>**

नि.फौ.ख.क्र. ६२/२००१

सरकार –वि– शब्बीर खान

नि.क्र.२०

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – अशोक जानराव देशमुख,

वय. ६७ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त शिपाई,

राहणार – साई नगर, शेगाव, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.</u>**

१. सन १९९९ मध्ये मी कुठे व काय म्हणून कार्यरत होतो हे आता मला आठवत नाही. मी बुलडाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक येथे शिपाई म्हणून कार्यरत होतो. शेगाव येथे कार्यरत असतांना शब्बीर खान आमच्या बँकेत कशासाठी आला होता याबाबत मला आता आठवत नाही. आमच्या बँकेच्या कर्मचाऱ्यांनी शब्बीर खान विरुध्द कशाबाबतीत पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला होता हे आता मला आठवत नाही. घटनेबद्दल मला काही माहिती नाही.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने सरकारी अभियोक्ता यांच्या विनंती वरुन उलट तपासणी करण्याची परवानगी देण्यात येत आहे</u>. <u>उलट तपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांच्यामार्फत</u> :–**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि.२७.१२.१९९९ रोजी मी बुलडाणा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शेगाव शाखेत शिपाई म्हणून कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यादिवशी माझी ११.०० ते ०३.०० या वेळेत ड्युटी होती. हे म्हणणे खरे आहे की, खातेदारांना पैसे काढण्याचे व जमा करण्याचे फॉर्म देणे व बॅकेतील इतर किरकोळ काम करणे हे कर्तव्य मी माझ्या ड्युटीदरम्यान करत होतो. त्यादिवशी शब्बीर खान शाखेत आल्यानंतर मी त्याला खाते उघडण्याचा फॉर्म दिला की काय हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दुसऱ्या दिवशी दि.२८.१२.१९९९ रोजी मी बँकेच्या शाखेत आलो असता बँकेचे प्रबंधक भाऊराव झाडे यांनी मला माहिती दिली की, राजाराम असन झाडे यांच्या नावावर असलेला १३,१९०/– रुपयाचा धनादेश संशयीत इसम शब्बीर खान याने खोटी सही करुन वटविला आहे व त्यामुळे बँकेची फसवणुक केली. माझ्या बयाणातील अधोरेखांकीत भाग–अ

पोलीसांनी का लिहिला आहे याचे कोणतेही कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सांगण्याप्रमाणेच पोलीसांनी माझ्या बयाणातील अधोरेखांकीत भाग–अ लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, शब्बीर खान याच्याशी संगणमत करुन मी राजाराम झाडे यांचा धनादेश वटविलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला चांगल्या प्रकारे ओळखत असल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| ( एन. डी. मेश्राम ) | ( एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.२३.०२.२०२६ | दि.२३.०२.२०२६ |

**फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ प्रमाणे पुरावा**

नि.फौ.ख.क्र. ६२/२००१

सरकार –वि– शब्बीर खान

नि.क्र.२१

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते कीः–

माझे नाव – कु. अनघा भास्कर देशपांडे,

वय. ५६ वर्षे, व्यवसाय – माझी लिपीक,

राहणार – मटकरी गल्ली, शेगाव, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

**सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.**

१. सन १९९९ मध्ये मी बुलडाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शेगाव शाखेत कनिष्ट लिपीक म्हणून कार्यरत होती. बँकेमध्ये माझी काऊंटरवर बचत खाते उघडण्याची व बचत खात्यातून खातेधारकांना पैसे देण्याची ड्युटी होती. बचत खात्यातून पैसे काढण्यासाठी खातेधारक पैसे काढण्याचा फॉर्म व धनादेश देतात. पैसे काढण्यासाठी आलेल्या फॉर्मची व धनादेशाची मी नोंद ठेवत नव्हती. पैसे काढण्यासाठी खातेधारक बँकेत आले असता खातेधारकाचे नाव व त्याला दिलेल्या टोकनची नोंद टोकन रजिस्टरमध्ये केल्या जाते. खातेधारकांना देण्यात आलेल्या टोकनवर बँकेचा सिम्बॉल असतो. असे आमच्याकडे एकुण किती टोकन असतात याबाबत आता मला आठवत नाही. पैसे काढण्याच्या फॉर्मवर रोखपालाकडून खातेधारकाला पैसे देतांना त्यावर खातेधारकाची सही घेतल्या जाते. धनादेश प्राप्त झाल्यानंतर ज्या बँकेचा चेक आहे त्या बँकेकडे तो चेक पाठविल्या जातो. दि.२७.१२.१९९९ रोजी राजाराम असन झाडे पैसे काढण्यासाठीचा फॉर्म घेवून आले होते की काय याबाबत मला आठवत नाही. बचत खाते उघडण्यासाठी राजाराम असन झाडे यांचा फॉर्म प्राप्त झाला होता की काय हे आता मला आठवत नाही. या प्रकरणातील घटनेबद्दल मला काही माहित नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने सरकारी अभियोक्ता यांच्या विनंती वरुन उलट तपासणी करण्याची परवानगी देण्यात येत आहे. उलट तपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांच्यामार्फत :–**

२. दि.२७.१२.१९९९ रोजी राजाराम असन झाडे यांचा फोटो लावलेला फॉर्म बचत खाते उघडण्यासाठी मला प्राप्त झाला होता की काय याबाबत मला माहिती नाही.

त्यानंतर मी राजाराम असन झाडे यांना पासबुक नं.२०४२३ दिले की काय हे मला आता आठवत नाही. राजाराम असन झाडे याने धनादेश दिल्यानंतर मी त्याला टोकन दिले होते की काय हे आता मला आठवत नाही. टोकनची नोंद मी टोकन रजिस्टरमध्ये केली होती की काय हे मला आता आठवत नाही. टोकन नं.३३ राजाराम असन झाडे याला दिला होता की काय हे आता मला आठवत नाही. तो टोकन जमा करुन रोखपालाकडून राजाराम अजन झाडे याने पैसे घेतले होते की काय याबाबत मला आता आठवत नाही. दि.२८.१२.१९९९ रोजी शब्बीर खान याने राजाराम अजन झाडे याच्या खोट्सा सह्या करुन खाते उघडून बँकेची ठकबाजी केल्याचे मला व्यवस्थापकाकडून माहित झाले होते की काय हे आता मला आठवत नाही. खाते उघडण्याच्या फॉर्मवर आरोपीचा फोटो होता की काय हे आता मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, खाते उघडण्याच्या फॉर्मवर असलेला फोटो व आरोपीला बघितले तर मी ओळखु शकते. आरोपीने दुसऱ्याच्या नावाचा चेक वटवून बँकेची फसवणुक केली होती की काय हे आता मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने खामगाव येथील बँकेची अशाच प्रकारे फसवणुक केल्याचे मला माहिती झाले होते की काय हे मला आठवत नाही. माझ्या बयाणातील अधोरेखांकीत भाग–अ पोलीसांनी का लिहिला आहे याचे कोणतेही कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सांगण्याप्रमाणेच पोलीसांनी माझ्या बयाणातील अधोरेखांकीत भाग–अ लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, या प्रकरणामध्ये मी कोणतीही शहानिशा न करता खोट्या व्यक्तीला धनादेश देवून चेक वटविण्यास प्रवृत्त केले व त्यामध्ये मी निष्काळजीपणा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, या प्रकरणात माझा फायदा असल्यामुळे मी त्यामध्ये निष्काळजीपणा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला चांगल्या प्रकारे ओळखत असल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| ( एन. डी. मेश्राम ) | ( एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.२३.०२.२०२६ | दि.२३.०२.२०२६ |